# एक्स्टेन्शिया कंपनीचा विस्तार कार्यक्रम

मुंबई, दि. २५ - तंत्रज्ञानविषयक सेवा पुरविणारी कंपनी एक्स्टेन्शियाने आता आग्नेय आशियाई तसेच आशिया-प्रशांत महासागर प्रदेशातील बाजारपेठांमध्ये ही आपल्या कामाचा विस्तार केला आहे. कंपनीने त्यासंबंधीची अधिकृत घोषणा केली. १९९८ साली स्थापन झालेल्या या कंपनीने सिंगापूरमध्ये विविध ॲपल उत्पादनांना असलेली मोठी मागणी लक्षात घेऊन स्थानिक कंपनीच्या भागीदारीत या भागात विविध प्रकारच्या तंत्रज्ञानविषयक सेवा पुरविण्याचे ठरविले आहे. श्री जी सेवेचा वर्षाला ३० टक्के इतक्या वेगाने वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर कंपनीला सिंगापूर आणि इतर आसिआन राष्ट्रांमधील बाजारपेठा बँकर ते गृहिणी अशा विविध प्रकारच्या ग्राहकांच्या ग्राहकांना मोबाइल आधारित विविध सेवा आणि त्यासंबंधीची उत्पादने पुरविण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरतील असे कंपनीला वाटते.

या प्रसंगी बोलताना एक्स्टेन्शियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी उम्मीद कोठावाला म्हणाले की, सिंगापूर आणि इतर आसियान बाजारपेठांमध्ये चांगला विस्तार करण्याची आम्हाला खात्री आहे. कंपनीच्या तंत्रज्ञानविषयक कौशल्याचा चांगला उपयोग होऊ शकेल असे अनेक प्रकारचे उद्योग या प्रदेशात आहेत. त्याखेरीज ऑफ शोअरींगाचा ही फायदा आहेत. आग्नेय आशियाई देशातील ग्राहकांच्या दृष्टीने आम्ही भौगोनिकदृष्ट्याही जवळ असल्याने त्याचाही फायदा होईल. त्यामुळे ऑस्ट्रेलियातील यशाप्रमाणेच याही बाजारपेठेमध्ये आम्हाला यश मिळेल असा आम्हाला विश्वास वाटतो.